मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि. 23 ऑगस्ट 2024 | पान- 1

# नागरी सहभाग उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद..!

## पिंपरी-चिंचवड शहरातील उपाययोजना, उपक्रम, प्रकल्प यामध्ये नागरिकांचा सहभाग : नागरिक त्यांच्या अपेक्षा, सूचना, कल्पना ऑनलाईन पद्धतीने नोंदवित आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

'अंदाजपत्रकात नागरी सहभाग' या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महत्वाकांक्षी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत शहरातील विविध भागांतून नागरिकांनी रस्ते, सांडपाणी, आरोग्य, उद्याने, क्रीडांगणे आणि इतर सार्वजनिक सुविधांबाबत ऑनलाईन पद्धतीने अर्ज केले आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध उपाययोजना, उपक्रम, प्रकल्प यामध्ये नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या माध्यमातून महापालिकेस नागरिकांच्या मागणीनुसार महापालिका हद्दीतील संबंधित परिसरांमध्ये विकासकामे करण्यासाठी मदत होणार आहे. "पीसीएमसी स्मार्ट सारथी" या मोबाईल ॲपच्या माध्यमातून नागरिक त्यांच्या अपेक्षा, सूचना, कल्पना ऑनलाईन पद्धतीने नोंदवित आहेत.

पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नागरिकांनीही त्यांच्या परिसरातील पायाभूत सोयीसुविधांबाबत मागण्या आणि सूचना देणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकाची सूचना महत्त्वाची असून नागरी परिसराचा विकास साधण्यासाठी महापालिकेस यामुळे मदत होणार आहे या अभियानात नागरिकांचा सहभाग वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने जनजागरण मोहिम राबविण्यात येत असून वृत्तपत्रे, रेडिओ, व्हीएमडी बोर्डस याखेरीज सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करून नागरिकांना अंदाजपत्रकातील सहभागाचे महत्व समजावून सांगितले जात आहे. त्यासाठी महापालिका हद्दीत खास चित्ररथ (एलइडी व्हॅन) च्या सहाय्याने शहरातील विविध भागातील नागरिकांना सहभागी होण्याबाबत आवाहन केले जात आहे. अनेक नागरिकांना या चित्ररथामुळे यामागील कल्पना आणि उद्दिष्टे समजावून सांगण्यास मदत होत आहे. तसेच चित्ररथावरील क्युआर कोडच्या माध्यमातून अनेकांनी आतापर्यंत या मोहिमेत सहभागी होऊन त्यांच्या परिसरातील पायाभूत सुविधांबाबतच्या मागण्या, अभिप्राय नोंदविल्या आहेत.




### परिसराचा विकास साधण्यासाठी महापालिकेस मदत

» पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नागरिकांनीही त्यांच्या परिसरातील पायाभूत सोयीसुविधांबाबत मागण्या आणि सूचना देणे गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकाची सूचना महत्त्वाची असून नागरी परिसराचा विकास साधण्यासाठी महापालिकेस यामुळे मदत होणार आहे. तसेच चालू वर्षात नागरिकांनी नोंदविलेल्या अडचणी, समस्या किंवा मागण्यांचा विचार नवीन वर्षाच्या अंदाजपत्रकात (२०२५-२६) करण्यात येणार आहे. तरी स्मार्ट सारथी ॲपच्या माध्यमातून नागरिकांनी स्वत:ची प्राथमिक माहिती भरून अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### अर्ज करण्याची प्रक्रिया

» शहरातील नागरिक महापालिकेचे अधिकृत संकेतस्थळ, स्मार्ट सारथी ॲप तसेच https://fxurl.co/9kiz9 या वेबलिंकद्वारे किंवा बारकोडद्वारे प्राथमिक माहिती भरून ऑनलाईन पद्धतीने घरबसल्या अर्ज करू शकतात.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अंतर्गत महापालिकेच्या वतीने बँकांसोबत बैठक

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अंतर्गत हस्तांतरित करण्यात आलेली आर्थिक लाभाची रक्कम कोणत्याही थकीत कर्जाच्या बदल्यात समायोजित करण्यात येऊ नये

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अंतर्गत हस्तांतरित करण्यात आलेली आर्थिक लाभाची रक्कम कोणत्याही थकीत कर्जाच्या बदल्यात समायोजित करण्यात येऊ नये, तसेच आधार कार्ड बँकेशी संलग्न नसल्यास विशेष मोहीम राबवून यासंदर्भात कामकाज लवकरात लवकर पूर्ण करावे, आणि लाभार्थ्यांचे प्रलंबित कर्जाची परतफेड न केल्यामुळे बंद असलेले बँक खाते तात्काळ सुरु करण्यात यावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना केले.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या अनुषंगाने जुलै आणि ऑगस्ट २०२४ महिन्याची एकत्रित रक्कम लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. त्यानुसार लाभार्थी महिलांच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाले आहे. परंतु काही लाभार्थी महिलांच्या खात्यात अद्यापही ही रक्कम जमा झालेली नाही. याबाबत तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी आज जिल्हा मध्यवर्ती बँकेसमवेत बैठक घेण्यात आली, यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी समाज विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे तसेच इंडसइंड बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, युनियन बँक ऑफ इंडिया, कोटक महिंद्रा बँक, ॲक्सिस बँक, कॅनरा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, आयडीबीआय बँक, आयसीआयसीआय बँक, एचडीएफसी, बँक ऑफ इंडिया, एलडीएम आदी बँकेचे व्यवस्थापक आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बँकेशी आधार संलग्न ( आधार सीडेड) नसलेल्या लाभार्थी महिलांची यादी बँक निहाय शेअर करण्यात आली आहे. बँकेशी आधार संलग्न नसल्यामुळे बऱ्याच लाभार्थी महिलांच्या खात्यात लाभाची रक्कम जमा झालेली नाही, अशा महिलांना संपर्क करून उर्वरित कामकाज पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात येणार आहे. जेणेकरून या मोहिमेच्या माध्यमातून बँकेशी आधार संलग्न करण्याचे कामकाज पूर्ण करण्यात येईल.

# बारा मीटर रुंदीच्या आतील रस्ते दुरुस्तीसाठी प्रत्येकी पाच लाख

## महापालिकेने बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे पथ विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याची बाब समोर आली होती.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील मोठ्या रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजविण्याकडे महापालिकेच्या पथ विभागाने कंबर कसली आहे. मात्र, महापालिकेने बारा मीटर रुंदीच्या आतील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे पथ विभागाकडून दुर्लक्ष केले जात असल्याची बाब समोर आली होती. त्यासाठी १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी ५ लाख रुपये देण्यात आले आहेत..

रस्त्यांची दुरुस्ती मुख्य खात्याने करावी की क्षेत्रीय कार्यालयाने करावी, या जबाबदारीची ढकलाढकली सुरु होती. पुणेकरांकडून संताप व्यक्त केल्यानंतर महापालिकेला जाग आली असून शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी ५ लाख रुपये देण्यात आले असून खड्डे बुजण्याचे काम वेगाने करण्याची आदेश देण्यात आले आहे.

शहरात होणाऱ्या मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. खड्डे बुजवण्याचे कामे महापालिकेच्या पथ विभागाकडून केले जात आहे. मात्र उपनगर भागातील तसेच अंतर्गत १२ मीटरच्या आतील रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे या रस्त्यांवरील खड्डे बुजवले जाणार की या खड्ड्यात पडून नागरिकांनी जीव गेल्यावर महापालिकेला जाग येणार, असा संतापजनक सवाल नागरिकांकडून विचारला जात होता. यामुळे पथ विभागाच्या मुख्य खात्याने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाला ५ लाख रुपयांचा निधी दिला आहे. यामुळे खड्ड्यामध्ये मुरुम टाकण्याचे काम केले जाणार आहे. तसेच दुरुस्तीसाठी जो काही खर्च केला जाणार आहे, तो या निधीतून केला जाणार आहे, त्यामुळे आता १२ मीटर रस्त्यांवरील खड्डे बुजवले जातील, असा दावा पथ विभागाने केला आहे.

क्षेत्रीय कार्यालयांकडे रस्त्यांवरील खड्डे बुजवण्यासाठी काही वेळी निधी नसल्याचे सांगितले जात होते. तसेच डांबरच मिळत नसल्याने खड्डे बुजवण्यास वेळ लागत असल्याचे सांगितले जात होते. या कामासाठी क्षेत्रीय कार्यालयांना पथ विभागाच्या मुख्य खात्याकडेच पाठपुरावा करावा लागतो. त्यानंतर दोन दिवसांनी एखादी गाडी मिळते, असे क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या तक्रारी होत्या. दरम्यान शहरात बारा मीटर पेक्षा अधिक रुंदीच्या तुलनेत बारा मीटरपर्यंत रुंदी असणाऱ्या रस्त्यांची संख्या आणि एकूण लांबी अधिक आहे.



### प्रत्येकी पाच लाखांचा निधी

» शहरात विविध ठिकाणी महावितरण, एमएनजीएल, चोवीस तास पाणी पुरवठा योजना, नव्याने ड्रेनेज लाईन टाकणे आदी कामांसाठी रस्त्यांची खोदाई मोठ्या प्रमाणावर केली गेली. परंतु या रस्त्यांची डागडुजी योग्य पद्धतीने केली नसल्याने अशा ठिकाणी खड्डे पडण्याचे प्रमाण अधिक आहे. क्षेत्रीय कार्यालय आणि मुख्य खाते यांच्या वादात छोट्या रस्त्यांवरील खड्डे बुजवले जात नव्हते. मात्र, आता प्रत्येकी पाच लाखांचा निधी मिळाला आहे. त्यामुळे खड्डे बुजवले जातील, असा विश्वास पथ विभागाने व्यक्त केला आहे.

> पथ विभागाच्या मुख्य खात्याकडून शहरातील १५ क्षेत्रीय कार्यालयांना बारा मीटरच्या आतील रस्त्यांवरील पडलेले खड्डे बुजवण्यासाठी पाच लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. खड्डे बुजवण्यासाठी निधी तात्काळ उपलब्ध व्हावा, असा यामागे उद्देश आहे. यामुळे खड्डे बुजवण्याच्या कामाला गती येईल. ही कामे सुरू असताना नागरिकांनी रस्त्यावरुन प्रवास करताना काळजी घ्यावी.
>
> **- साहेबराव दांडगे, अधिक्षक अभियंता, पथ विभाग, पुणे महापालिका**

# पौड रस्त्याचा झाला कोंडवाडा; वनाझ मेट्रो स्थानक ते चांदणी चौकादरम्यान वाहतुकीचा बोजवारा

## पुण्यातील पौड रस्त्यावरील वनाझ मेट्रो स्थानकाजवळील सीएनजी पंपापासून चांदणी चौकापर्यंत दैनंदिन वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील पौड रस्त्यावरील वनाझ मेट्रो स्थानकाजवळील सीएनजी पंपापासून चांदणी चौकापर्यंत दैनंदिन वाहतुकीचा बोजवारा उडाला आहे. येथे रोज होत असलेल्या कोंडीमुळे वाहनचालक आणि प्रवाशांच्या त्रासात भर पडली आहे.

रस्त्याच्या या भागात प्रचंड गर्दी होत असल्याने वाहतुकीचा प्रश्न गंभीर झाला आहे. वाहनचालक आणि प्रवाशांना आधीच शहरात ठिकठिकाणी प्रचंड रहदारीच्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागत आहे. कोंडीमुळे रोजच प्रवासाला लागत असलेली प्रदीर्घ वेळ आणि त्यामुळे निर्माण होणारा ताणतणाव यावर बहुआयामी दृष्टिकोनातून कायमस्वरुपी सर्वंकष उपाययोजना करणे नितांत गरजेचे असल्याचे पौड रस्ता भागातील रहिवाशांचे मत आहे.

या उपाययोजनांमध्ये रस्त्यांच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे, येथील वाहतुकीचे प्रभावी व्यवस्थापन आणि सार्वजनिक वाहतुकींचे पर्याय सहज सुलभपणे उपलब्ध करून रस्त्यांवर वाढलेले अतिरिक्त ओझे कमी करणे आदींचा समावेश असावा, असे या परिसरातील रहिवाशांचे म्हणणे आहे.

भुसारी वसाहतीतील रहिवासी गिरीश जालान यांनी 'सीविक मिरर'ला सांगितले की, "वनाझ मेट्रो स्थानकाजवळील सीएनजी पंपापासून चांदणी चौकापर्यंतच्या पौड रस्त्याच्या एक किलोमीटरच्या टप्प्यात भुसारी वसाहतीजवळील दोन चौकांत संध्याकाळी रहदारीच्या वेळी प्रचंड कोंडी होते. कात्रजकडे जाणाऱ्या रस्त्यातील चौकातही मोठ्या रहदारीच्या काळात याच समस्या आहेत. येथेही अशाच भीषण वाहतूक कोंडीला चालकांना रोज तोंड द्यावे लागते. चौका-चौकांत बेशिस्तपणे वाहने उभी केली असल्याने या पार्किंगचा रहदारीला मोठा अडथळा होतो. याशिवाय भुसारी वसाहतीच्या चौकालगतच्या बसस्थानकावर, प्रवासी बसची वाट पाहत चक्क रस्त्यावर उभे राहतात. त्यामुळेही वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो."



### आढळरावांना पुन्हा डावलले

» अतिरिक्त रहदारीला सामोरे जाण्यासाठी रस्ता रुंदीकरण. वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक चौकांची आणि वाहतूक छेदन बिंदूंची नव्याने रचना करणे, तसेच सुलभ पद्धतीने वळता येईल, अशा लेनची रचना करण्याची गरज आहे.

» गर्दीच्या वेळी वाहतूक व्यवस्थापन सुरळीत आणि प्रभावीपणे करण्यासाठी 'सेन्सर'सह वाहतूक नियंत्रक दिवे (ट्रॅफिक सिग्नल) कार्यान्वित करणे.

» अनधिकृत, अव्यवस्थित आणि बेशिस्त वाहनतळांच्या (पार्किंग) विरोधात कठोर कारवाई करण्याची गरज. विशेषत: चौक आणि बस स्थानकांजवळील बेशिस्त 'पार्किंग'विरुद्ध कारवाई करणे गरजेचे. त्यासाठी पर्यायी अधिकृत वाहनतळ निर्मिती करण्याची आवश्यकता.

» अनधिकृत टपऱ्या-दुकाने आणि विक्रेत्यांना येथे अतिक्रमण करण्यापासून रोखण्यासाठी गस्त आणि प्रतिबंधक कारवाई करण्याची गरज. सार्वजनिक जागा स्वच्छ आणि मोकळ्या ठेवण्यासाठी सातत्याने कारवाई करण्याची गरज.

# चक्क नदीपात्रात कचरा संकलन डेपो

## माण ग्रामपंचायत रोज जमा करते 20 टन कचरा : दूषित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुळा नदी पात्रालगत माण ग्रामपंचायतीने आपल्या हक्काचा कचरा डेपो बनविला आहे. नदी पात्रालगत खासगी जागेत दररोज २० टन कचऱ्यांचे संकलन होते. पावसामुळे नदीला पूर आल्यास नदीपात्रात ठेवलेला कचरा पाण्याबरोबर पुढे वाहून जात असल्याचे विदारक सत्य समोर आले आहे. त्यामुळे नदीकाठच्या बहुतांश ग्रामपंचायतींनी नदीपात्र हे कचऱ्याचा डेपो बनविला असून त्याचा हिंजवडीसह बालेवाडी, बाणेर भागातील नागरिकांना त्रास होत आहे.



नदीकाठच्या अनेक सोसायट्या नदीच्या पाण्यावर प्रक्रिया करुन पिण्यासाठी पाणी वापरत आहे. या सोसायट्यांना दुर्गंधी आणि रसायनयुक्त पाणी प्यावे लागत आहे. कचऱ्यामुळे नदीचे दूषित होणाऱ्या पाण्याचे करायचे काय? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

माण ग्रामपंचायतीने मुळा नदी पात्रालगत कचरा संकलन केंद्र तयार केले आहे. ग्रामपंचायत हद्दीतील दररोज २० टन कचरा संकलन केला जात आहे. त्या कच-यांचे एकत्रित संकलन करण्यासाठी नदी पात्रात खाजगी जागेवर संकलन डेपो तयार केला आहे. त्या कचरा संकलन डेपोमुळे अनेक सोसायट्यांना त्रास होवू लागला आहे.

सध्या पावसाळा सुरु आहे. अतिवृष्टीने मुळा-मुठा नद्यांना पूर येत आहे. या पुरामुळे माण ग्रामपंचायतीने नदी पात्रात तयार केलेला कचरा संकलन डेपोतील कचरा वाहून जात आहे. त्या वाहून जाणा-या कच-यामुळे नद्यांचे पाणी प्रदूषित होत आहे. शिवाय कच-यातून दुर्गंधी व रसायनयुक्त पाणीदेखील नद्यांमध्ये मिसळत आहे.

माण ग्रामपंचायतीने टाकलेल्या कच-यामुळे नदीकाठच्या ब्लू रिज टाऊनशिप, हिंजवडी, सेन्सोरियम, माण, जॉयविले हिंजवडी-माण, यशोने माण यासह अनेक सोसायटीतील नागरिकांना कच-यांच्या दुर्गंधीसह दुषित पाण्याचा मनस्ताप होत आहे. यातील ब्लू रिज टाऊनशिप, सेन्सोरियम आणि जॉयविले सोसायट्यांना पिण्याच्या पाण्यासाठी नदीतून थेट पाणी पुरवठा होत आहे.

नदीत कच-याचे केमिकलयुक्त पाणी मिसळत असल्याने सोसायट्यांना दूषित पाणी मिळत आहे. मागील काही दिवसात अनेक सोसायटीच्या पिण्याच्या पाण्यात लाल अळ्या आढळून आल्या होत्या. त्यामुळे दूषित पाण्यामुळे किटकजन्य आजार पसरण्याची दाट शक्यता आहे. या कच-यामुळे सोसायटीतील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीच्या कचरा संकलन डेपोमुळे मुळा नदीला गटारगंगेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या नदीत बहुतांशी ग्रामपंचायती नदी पात्रात कचरा टाकत आहे. नदीत चक्क कचऱ्याचे डोंगर तयार होवू लागले आहेत. काही कंपन्या व कारखाने रसायनयुक्त पाणी थेट नदीत सोडत असून मुळा नदीतील दुषित पाण्याचे करायचे काय? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. तसेच मुळा नदी पात्रात ग्रामपंचायती कचरा तर कारखाने व कंपन्या मोठ्या प्रमाणात रसायनयुक्त पाणी थेट नदीपात्रात सोडत आहेत. त्यामुळे नदीचे पाणी दुषित झाले आहे. नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी ग्रामपंचायती अथवा कंपन्यांवर कारवाई कधी करणार असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### माण ग्रामपंचायतीस दंड

» राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) पुणे खंडपीठाने माण ग्रामपंचायतीला बेकायदेशीर कचरा टाकून पर्यावरणाची हानी केल्याबद्दल ३४ लाखांचा दंड ठोठावला होता. दंड भरताना वर्षाच्या कालावधीत कचरा काढून टाकण्याचे निर्देश दिले होते. तो कचरा काढून टाकेपर्यंत प्रत्येक महिन्याला एक लाख रुपये दंड आकारण्यात आला होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वसूल केलेला दंड कचऱ्यामुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान पुर्नस्थापित करण्यासाठी वापरावा असेही आदेश दिले दिले होते.

“ माण ग्रामपंचायत दररोज २० टन कचरा गोळा करते. त्यात ओला, सुका, घातक कचरा वेगवेगळा करुन नदी पात्रालगत एका खासगी जागेत संकलित केला जात आहे. यासाठी ग्रामपंचायतीने स्वतंत्र ठेकेदार संस्था नियुक्त केलेली आहे. सकाळपासून दुपारी दोन वाजेपर्यंत कचरा गोळा करुन त्यानंतर तो मुरखेडला प्रक्रिया करण्यासाठी नेला जात आहे. त्यामुळे नदीपात्रालगत केवळ कच-यांचे संकलन केले जाते. तिथे कचरा कायम स्वरुपी ठेवला जात नाही. ग्रामपंचायतीने पुणे जिल्हाधिका-यांकडे पाच एकर जागा कचरा डेपोसाठी मागितली आहे. त्यानंतर कचरा संकलन, प्रक्रिया केंद्र उभारण्यात येणार आहे.

**- मदन शेलार, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, माण.**

# महानगरपालिका आणखी 15 जागा मेट्रोला देणार

## आकुर्डी येथील 4, निगडी येथील 8 आणि चिंचवड येथील 3 अशा एकुण 15 जागा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महा-नगरपालिका ते निगडी या मेट्रो मार्गिकेच्या अनुषंगाने पालिका हद्दीतील एकूण १५ जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरु असल्याची माहिती भूमि व जिंदगी विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी दिली.



महानगरपालिकेने दापोडी ते पिंपरी मेट्रो मार्गाकरिता मौजे पिंपरी येथील ५ जागा, वल्लभनगर येथील २ जागा, फुगेवाडी येथील २ जागा आणि दापोडी येथील १ जागा अशा एकूण १० जागांचा आगाऊ ताबा पालिका सभेच्या ठरावानुसार अटी व शर्तीवर ३० वर्षे कालावधीसाठी महामेट्रोला २०१८ साली दिला आहे. आता पिंपरीतील महापालिका भवन ते निगडी मार्गिकेच्या कामासाठी आकुर्डी येथील ४, निगडी येथील ८ आणि चिंचवड येथील ३ अशा एकुण १५ जागा महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला देण्याची कार्यवाही सुरू आहे.

याकरिता महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड व पिंपरी चिंचवड महापालिकेत उत्तम समन्वय असून यासाठी आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही संस्थेचे संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक पार पडली. तसेच, जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरळीतरित्या सुरू असून त्यात कोणताही अडथळा नाही. महामेट्रोची स्थिरता व वित्तीय व्यवहार्यता तसेच तिकीटोत्तर उत्पन्न वाढविण्यासाठी आवश्यक जमिनीचा वाणिज्यिक वापर करणे आवश्यक आहे. त्यासाठी महापालिकेच्या हद्दीत असलेल्या या जमिनी मालकी हक्काने व बिनशर्त देण्यात याव्यात अशी विनंती महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशनने महाराष्ट्र शासनास केली होती.

# स्टॉलची परवानगी देण्यास अद्याप मुहूर्त नाही

## पावसाचा फटका अनेकांना बसूनही महापालिकेचा अजब दावा : बाराशे कर्मचारी होते तैनात

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेने शहरातील सर्व गणेश मंडळांची तसेच संघटनांची ७ ऑगस्ट रोजी बैठक घेतली होती. ही बैठक नेहमीपेक्षा लवकर झाल्याने सर्वांनीच महापालिकेचे कौतुक केले होते. बैठक संपताच गणेश मुर्ती विक्रेत्यांना परवाना देण्याची कार्यवाही सुरु केली जाईल असे आयुक्तांनी जाहीर केले होते. तसेच या परवानग्या ३१ ऑगस्टपर्यंत देण्यात येतील असेही स्पष्ट केले होते. मात्र, अद्याप याची कोणतीही कार्यवाही सुरु झाली नसून कोणालाही स्टॉलची परवानगी दिली नसल्याचे अतिक्रमण विभागाने स्पष्ट केले आहे.



महापालिकेच्या परवानगी शिवाय विविध ठिकाणी बेकायदा गणेश मुर्ती विक्रीचे स्टॉल उभे राहू लागले आहेत. त्याबाबत नागरिकांनी तक्रारी केल्यानंतर महापालिकेच्या पथ विभागाने एकही परवानगी दिली नसल्याचे सांगितले. तसेच गणेश मुर्ती विक्री स्टॉलची जाहिरात दोन दिवसात प्रसिध्द केली जाईल असे स्पष्ट केले. त्यामुळे ही जाहिरात आल्यानंतर स्टॉलधारकांना परवानगी देण्याची प्रक्रिया सुरु होईल. त्यामुळे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितल्याप्रमाणे ३१ ऑगस्ट पर्यंत परवानगी देण्याच्या आदेशाचे पालन होणे शक्य नसल्याचे बोलले जात आहे. तसेच सध्या शहरात उभारल्या जात असलेल्या बेकायदा स्टॉलची पाहणी करुन ते थेट काढून टाकले जाणार असल्याचे अतिक्रमण विभागाचे प्रमुख सोमनाथ बनकर यांनी सांगितले आहे. त्यावर असे आदेश लेखी असतील तर त्याची प्रत देण्याची मागणी केली असता, त्यांनी थेट आदेश केवळ तोंडी असल्याचे सांगून विषयाला फाटा देण्याचा प्रयत्न केला. तसेच ही जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयाची असल्याचे सांगितले. त्यामुळे गणेशमूर्ती विक्रेत्यांना यंदा तरी दिलेल्या वेळेत परवानग्या देण्याबाबत पालिका गंभीर आहे का असा प्रश्न विचारला जात आहे.

गेल्या वर्षी प्रशासनाच्या उदासीन कारभारामुळे गणेश उत्सव सुरु झाल्यानंतर गणेश मूर्ती विक्रेत्यांना परवानगी दिल्याचा अनुभव आला होता. याबाबत विक्रेत्या संघाने बैठकीत तक्रार देखील केली होती. तसेच यंदा

> गणेश मूर्ती विक्रेत्यांना अद्याप एकही परवानगी देण्यात आलेली नाही. ज्या ठिकाणी गणेश मुर्ती विक्रीसाठी बेकायदा स्टॉल उभारण्यात आले असतील त्यांना नोटीस दिली जाणार आहे. त्यांनी स्वत:हून काढून घेतले नाही तर ते थेट काढून टाकले जातील. शहरातील विविध ठिकाणी स्टॉल उभारण्यासाठी सोडत काढली जाणार आहे. त्याबाबतची जाहिरात दोन दिवसात प्रसिद्ध होईल.
> **- सोमनाथ बनकर, प्रमुख, अतिक्रमण विभाग, पुणे महापालिका.**

ज्या प्रमाणे लवकर बैठक घेतली, त्याप्रमाणे ३१ ऑगस्टपर्यंत सर्व गणेश मूर्ती विक्रेत्यांना परवानगी देण्याची मागणी मूर्ती विक्रेते संघाने केली होती. त्याची तात्काळ घेत आयुक्तांनी याबाबत आदेश देवून एक खिडकी योजना राबवून परवानग्या दिल्या जातील असे जाहीर केले होते. मात्र, अद्याप कार्यवाही झालेली नाही. गणेशोत्सवाच्या निमित्ताने दरवर्षी महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या स्तरावर मूर्ती विक्रेत्यांना शाळांची मैदाने, पटांगणे, मोकळ्या जागा येथे भाड्याने स्टॉल दिले जातात. त्यासाठी हंगामी सोडत काढली जाते. याबाबतची जाहिरात प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर ही प्रक्रिया पार पडणार आहे. ७ सप्टेंबर रोजी बाप्पाचे आगमन होणार आहे. त्यापूर्वी काही दिवस आधी स्टॉल लावल्यानंतर भक्तांकडून आवडीच्या गणेश मूर्तीचे बुकींग केले जाते. यामुळे स्टॉल धारकांचाही फायदा होतो. त्यामुळे स्टॉल परवानगीची प्रक्रिया जलद करावी अशी मागणी संघाने केली आहे.


शहरात वाहतूकीचा प्रश्न गंभीर आहे. त्यात अतिक्रमणाची भर पडत आहे. वाहतूक कोंडीतून तसेच पदपथावरून नागरिकांना चालण्यासाठी रस्त्याचा शोध घ्यावा लागतो. शहरात खासगी जागांसह पादचारी मार्ग, रस्त्यावर थेट मांडव टाकून मूर्ती विक्री सुरू केली जाते. यामध्ये महापालिकेचे आर्थिक नुकसान होतेच, शिवाय वाहतूक कोंडीत भरही पडते.

# पुणे बाजार समितीचा कारभार ठप्प

## शासकीय देणी थकली : सह्यांच्या अधिकाराबाबत प्रश्नचिन्ह कायम, समितीचे कामकाज ठप्प

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सभापती दिलीप काळभोर यांच्या सह्यांचे अधिकार काढण्याचा ठराव बहुमताने संमत झाला. संचालक प्रशांत काळभोर यांच्याकडे सह्यांचे अधिकार सोपवले. मात्र, सह्यांचे अधिकार काढण्याची तरतूद कायद्यात नाही आणि या ठरावाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे सह्यांचे अधिकार कोणाकडे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.



शासकीय देणी थकली असून, सचिवांनी पणन संचालकांना मार्गदर्शन करण्याची मागणी करूनही दुर्लक्ष होत असल्याने बाजार समितीचा कारभार अक्षरशः ठप्प झाला आहे. सभापती समितीच्या कामकाजात सर्व संचालकांना विश्वासात घेत नसल्याचा आरोप करत त्यांच्या सह्यांचा अधिकार काढून तो अन्य संचालकाकडे देण्याची मागणी दहा संचालकांनी सचिवांकडे जूनमध्ये केली होती.

त्यावर सचिवांनी लावलेल्या बैठकीला सभापतींसह अन्य संचालकांनी आव्हान दिले. पणन संचालकांनी त्यास स्थगिती दिली. त्यानंतर झालेल्या सुनावण्याअंती पणन संचालकांनी याबाबत बैठक घेण्याचा निर्णय सचिवांवर सोपविला. याविरोधात सभापती काळभोर यांनी उच्च न्यायालयात दाद मागितली. उच्च न्यायालयाने पणन संचालकांचेच आदेश कायम ठेवले. त्यानंतर सभापतीचे सह्या काढण्याचा ठराव संमत केला. यावर सभापती काळभोर यांनी विभागीय सहनिबंधक योगीराज सुर्वे यांच्याकडे आव्हान दिले आहे. यावर कोणताही निर्णय झाला नसल्याने समितीचे कामकाज ठप्प झाले आहे.

### पत्रात सचिव म्हणतात

कायद्यातील तरतुदीनुसार संचालक मंडळाच्या ठरावाच्या अंमलबजावणीत अडचणी येत आहेत. जे अधिकार सभापतींना आहेत, ते संचालक मंडळाला अशा ठरावाने काढून घेता येतील का? खर्चाचे अधिकार सभापती व सचिवांच्या सहीने करणे नमूद असताना ते संचालक मंडळातील सदस्यांना देता येतील का? सभापतींसमवेत सचिवांना सह्यांचे अधिकार आहेत.

मात्र, मी तात्पुरता पदभार स्वीकारला असल्याने व माझ्या उपस्थितीत सचिवांच्या सभापतीच्या सह्यांचा ठराव संमत झाला नसल्याने मला धनादेश व खर्चाच्या बिलावर सह्या करता येतील का? सभा आयोजित करण्याचा अधिकार सभापतींना असल्याने यापुढे ती कोणाच्या आदेशाने करावी, असा प्रश्न आहे.

सद्यस्थितीत बिले अदा करणे व धनादेशावर सह्या करण्याबाबत प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत मार्गदर्शन मिळावे, अशी मागणी सचिवांनी पणन संचालकांकडे केली आहे.